## कोयना परिरक्षण भांडार : एक आदर्श भांडार




कोयना जल विद्युत केंद्र संकुलातील सर्वात जुने विद्युत केंद्र म्हणजेच पोफळी टप्पा १ व २ येथे ४×७० मेगावॅट व ४×८० मेगावॅट असे एकूण आठ संच महाराष्ट्राच्या विद्युत पुर्तीसाठी अहोरात्र कार्यान्वित असतात. या सर्व संचाच्या उपलब्धतेसाठी संचाच्या टर्बाईन व जनरेटरच्या परिरक्षणाचे काम यांत्रिक परिरक्षण विभाग, पोफळी मार्फत केले जाते. या विभागाच्या यशस्वी कार्यप्रणालीत या विभागाच्या भांडाराचे Section Store चे महत्वाचे स्थान आहे. या भांडारात विविध अवजारे, Tools विविध कामाच्या उपयुक्तते प्रमाणे प्रत्येक अवजारास खास अशी जागा देवून वर्गवारी करून संग्रहीत केलेली आहेत. त्यामुळे एखाद्या कामाकरिता लागणारी सर्व अवजारे त्वरीत मिळतात. तसेच कार्यपुर्तीनंतर भांडारात अवजारे आपल्या योग्य ठिकाणी ठेवली जातात. अशी परंपरा येथील कर्मचारी व भांडारपाल विद्युत केंद्र निर्मिती पासून पाळत आलेली आहेत. त्याच प्रमाणे लागणारे सर्व सुट्टे भाग उपयुक्ततेप्रमाणे वर्गवारीत करून खास जागी ठेवले आहेत. भांडारपाल हे या सर्व बाबींचा वेळच्यावेळी रोजच्या रोज आढावा व तपशील घेत असतात, त्यामुळे परिरक्षणाच्या कामात सहजता व भागांची उपलब्धता ठेवण्यास मोलाची मदत होते. यामुळे याविभागीय भांडाराची कार्यप्रणाली महाजेनको कंपनीत उल्लेखनीय ठरली आहे.

## आपण यांना अंतरलो

१) **कै.रमेश गंगाराम माहोरे** - पहारेकरी , सुरक्षा विभाग, कोराडी औ.वि. केंद्र मृत्यु दिनांक - २४.०४.२००९

२) **कै. गणेश रामदास जाधव** - कारागीर क. उपकरण नियंत्रण विभाग, कोराडी औ.वि. केंद्र मृत्यु दिनांक - ०५.०५.२००९

३) **कै. प्रकाश मारोती रामटेके** - टंक लेखक, चंद्रपूर औ.वि. केंद्र मृत्यु दिनांक - २८.०४.२००९

४) **कै. परशुराम एम. तुरणकर** - कारागीर 'ड' चंद्रपूर औ.वि. केंद्र मृत्यु दिनांक - ०३.०५.२००९

५) **कै. प्रमोद भास्कर पोहनकर** - कारागीर 'क' राख हाताळणी विभाग, कोराडी औ.वि. केंद्र मृत्यु दिनांक - ०७.०५.२००९

६) **कै. पांडुरंग महादेव राऊत** - कारागीर 'ब' नियंत्रण कक्ष, संचालन टप्पा-, कोराडी औ.वि.केंद्र मृत्यु दिनांक - ०९.०५.२००९

७) **कै. पांडुरंग हरी वाघोदे** - खानसामा-चंद्रपूर औ.वि. केंद्र मृत्यु दिनांक - १२.०५.०९

८) **कै. यशवंत जे.खांडेकर** - वाहन संचलन विभाग, को.हा.वि. टप्पा-१, कोराडी औ.वि. केंद्र मृत्यु दिनांक - २५.०५.२००९

## कोयना ज.वि.केंद्राचा वर्धापनदिन उत्साहात साजरा



कोयना वि. केंद्राच्या वर्धापनदिनानिमित्त भेट देताना कार्यकारी संचालक (नि.प्र.-२) श्री.सुरेश नारखेडे सोबत महाव्यवस्थापक आर.डी. कदम व इतर अधिकारी.

कोयना जल विद्युत केंद्र टप्पा १ व २ चा ४७ वा वर्धापन दिवस आणि कोयना जल विद्युत केंद्र टप्पा ४ चा ७ वा वर्धापन दिवस दिनांक १६ मे २००९ रोजी साजरा झाला.

या समारंभाचे औचित्य साधुन श्री.एस.ए. नारखेडे, कार्यकारी संचालक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच या सभारंभास श्री.आर.डी. कदम, महाव्यवस्थापक, श्री.जी.एम. चव्हाण, श्री.एम.एम. मुठाळ, श्री.ए.ए. मेश्राम, श्री.एम.व्ही. फाळके, आणि श्री.एस.एस. जाधव, अधीक्षक अभियंते इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## कोयना ज.वि.केंद्रास कार्यकारी संचालक (मा.सं.) यांची भेट

कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे श्री.अरविंद चौधरी, कार्यकारी संचालक (मा.सं.) यांनी दिनांक ३० एप्रिल आणि १ मे रोजी भेट दिली.

श्री.अरविंद चौधरी यांनी कंपनीसमोरील आव्हाने, उद्दिष्टे, ध्येये आणि मानव संसाधन अंतर्गत सुधारणा या विषयांवर सविस्तर माहिती देवून वीज अभियंत्यांना / अधिकाऱ्यांना कंपनीसमोरील आव्हानांचा सामना करण्याचे निवेदन केले. त्यांनी १ मे महाराष्ट्र दिन / कामगार दिनांनिमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांना हजेरी लावून अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

## पारस औ.वि.कें. येथे अग्निशमन सेवा सप्ताह साजरा



पारस औ.वि. केंद्र येथे दिनांक १४ ते २० एप्रिल २००९ या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने हुतात्मा स्मारकास औ.वि.केंद्र पारसचे महाव्यवस्थापक श्री.एस.डी.नेमाडे, प्रकल्पाचे महाव्यवस्थापक श्री.ए.आर. नंदनवार यांचे हस्ते पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यावेळी अधीक्षक अभियंते श्री.साखरे, चिरूटकर, निखारे, कुरुंदवाडकर, सुरक्षितता अधिकारी श्री.एस.पी. सुळेकर, श्री.एल.एस. दातीर श्री.एस.डी. शेंडे सहाय्यक अग्निशमन अधिकारी व श्री.ओ.के. पाल व इतर कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

या सप्ताहात कर्मचाऱ्यांमध्ये अग्निसुरक्षितते बाबत जागरूकता निर्माण व्हावी व अग्निशमन दलाचे महत्त्व कळावे यासाठी अग्निशमन मासिक, व्याख्यान असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री.अशोक रेवतकर, कनिष्ठ अग्निशमन अधिकारी यांनी केले. तसेच परेडचे संचालन श्री.अशोक पाटील, कनिष्ठ अग्निशमन अधिकारी यांनी केले.